ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३६ पुणे, बुधवार, २ सप्टेंबर, १९७० अंक १७

# विविधोपयोगिता


किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्ट्य होय !



गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

**विविध प्रकारच्या किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता**

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस • सीवेज • ड्रेनेज • सँडी वॉटर • स्टॉर्म वॉटर • फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँटस् • व्हिस्कस लिक्विडस् • तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज • खत कारखाने



यूपी एसव्हीए सीएच् एमएफ् के बीएच्आर

किर्लोस्कर

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२.

STUBA

### डिझेल एंजिनांचे छोटे कारखाने अडचणीत

डिझेल एंजिने तयार करणारे कारखाने संकटग्रस्त झालेले आहेत. मोठ्या कारखान्यांबरोबर छोट्या कारखान्यांवरही आर्थिक मंदीची सावली पडली आहे. छोट्या कारखान्यांना ह्या मंदीच्या लाटेला तोंड देणे फारच अवघड जात आहे. डिझेल एंजिनांचे उत्पादन करणारे अनेक छोटे कारखाने देशभर पसरलेले आहेत. कोल्हापूर, लुधिआना, गाझिआबाद, इत्यादी ठिकाणी असे ६०० कारखाने असून त्यांच्याजवळील विकल्या न गेलेल्या एंजिनांची किंमत जवळ जवळ १·५ कोटी इतकी आहे. एंजिनांच्या उद्योगधंद्यावर आलेल्या ह्या संकटाची अनेक कारणे सांगण्यात येत आहेत. गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागातील वीजपुरवठ्यात सतत वाढ होत आहे. त्यामुळे तेलावर चालणाऱ्या पंपाऐवजी विजेवर चालणाऱ्या पंपात वाढ होत आहे. शिवाय एंजिने विकत घेणाऱ्यांना वित्त संस्थांकडून जितके साह्य मिळावयास पाहिजे तितके आता मिळेनासे झाले आहे. आणखी एक कारण असे दाखविता येते. उसाच्या किमतीत बरीच घट झाल्यामुळे उसाच्या लागवडीच्या क्षेत्रातही बरीच घट होत आहे. परिणामी, पाणी उपसण्यासाठी लागणाऱ्या वीज अगर एंजिनचलित पंपांची मागणीही कमी झाली आहे. एंजिने करणाऱ्या छोट्या कारखान्यांना मदत व्हावी म्हणून सरकार काही प्रकारच्या छोट्या एंजिनांचे उत्पादन करण्याची परवानगी त्यांच्या पुरतीच मर्यादित करणार आहे. बहुधा १० अश्वशक्ती-पर्यंतची एंजिने तयार करण्याची परवानगी फक्त छोट्या कारखान्यांनाच देण्यात येईल. त्याशिवाय एंजिनांचा उठाव व्हावा म्हणून इतरही उपाय योजण्याचा विचार सरकार करीत आहे. राज्यनिहाय किमतींचाही विचार होत आहे.

---

### वीज वाटून घेण्यास राजस्थानचा नकार

राजस्थानमध्ये अणुशक्तीच्या साह्याने वीज उत्पन्न करणारे केंद्र उभारण्यात येत आहे. केंद्राचे काम पूर्ण होऊन बहुधा १९७२ मध्ये वीजनिर्मितीस प्रारंभ होण्याची शक्यता आहे. विजेच्या निर्मितीस प्रारंभ झाल्यावर ती शेजारी राज्यांना काही प्रमाणात वाटून द्यावी अशी सूचना राजस्थान सरकारला करण्यात आली होती. परंतु ती राज्य सरकारने नाकारली आहे. राज्य सरकारचे म्हणणे असे आहे की राज्यस्थानातील उद्योग-धंद्यांसाठी आणि ग्रामीण भागांसाठी विजेची गरज वाढत आहे. अर्थातच निर्माण होणाऱ्या विजेत भागीदार घेणे इष्ट होणार नाही. खुद्द राजस्थान मात्र सध्या तरी विजेच्या पुरवठ्याबाबत शेजारी राज्यांवर काही प्रमाणात अवलंबून आहे. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतातील औष्णिक वीजकेंद्र आणि चंबळ धरणावरील जल-विद्युत केंद्र येथे तयार होणारी वीज मध्यप्रदेश सरकार राजस्थान सरकारला पुरवीत आहे. त्याशिवाय भाक्रा धरणावर तयार होणारी वीजही राजस्थान सरकारला मिळत आहे. चंबळ धरणावर उत्पादन होणारी वीज अखेर पावसावर अवलंबून आहे. चंबळ नदीच्या पाणलोटाच्या क्षेत्रात गेली तीन वर्षे ओळीने अपुरा पाऊस झाला. त्यामुळे वीजनिर्मितीला जरूर तितकी जलशक्ती उपलब्ध होऊ शकली नाही. सध्याच्या अंदाजाप्रमाणे १९७२–७३ च्या सुमारास राज्यस्थान ४३४ मेगॅवॅट विजेचे उत्पादन करू शकेल. त्यात २०० मेगॅवॅट वीज राणाप्रताप अणुशक्ती केंद्रात निर्माण झालेली असेल; राज्यस्थानची विजेची गरज ४११ मेगॅवॅट इतकी असेल. तथापि, ग्रामीण भागांतून विजेचा पुरवठा करण्याच्या राज्याच्या योजना लक्षात घेतल्या तर खुद्द राजस्थानलाच विजेचा पुरेसा पुरवठा न होण्याची शक्यता दिसत आहे.

---

### कारखान्यांतील वाढती अपघातांची संख्या

औद्योगीकरणाची वाढ होत जाण्याबरोबरच काही प्रमाणात कारखान्यांतील अपघातांत वाढ होणेही अपरिहार्यच समजले पाहिजे. औद्योगिक संघटनांच्या चालकांनी कामगारांच्या सुरक्षिततेसंबंधी योग्य ते उपाय योजिले तरीही काही अपघात होत राहतातच. काही कामगारांच्या चुकाही अपघातास कारणीभूत होतात. असे असले तरी भारतात होणाऱ्या कारखान्यांतील अपघाताची संख्या वाढत आहे. ही गोष्ट चिंताजनक आहे. अपघातासंबंधीचे आकडे पुढील चित्र दाखवितात. १९६७ साली अशा अपघातांची संख्या १ लाख, ९६ हजारांवर होती ती १९६९ साली २ लाख, ६२ हजारांवर गेली. दरसाल सुमारे ७०० कामगार औद्योगिक अपघातात आपला प्राण गमावतात. १९६१ ते १९६७ ह्या अवधीत ३,८०० कामगार अपघाती मृत्यूला बळी पडले आणि १३ लाख काम-गारांना गंभीर स्वरूपाची इजा पोचली. कामगारांच्या दीर्घकालीन गैरहजेरीमुळे ह्याच काळात २१ कोटी रुपयांचे नुकसान झाले. वास्तविक कामगारांच्या सुरक्षिततेसाठी फार खर्च येत नाही. प्रत्येक कामगारामागे ह्यासाठी अवघा ८ रुपये खर्च येतो, असा हिशेब एका मोठ्या कंपनीच्या चालकाने केला आहे. कारखान्यांची तपासणी करण्याचे काम अधिक कडक रीतीने करण्यात आले तर अपघातांची संख्या कमी होईल. कारखान्या-शिवाय बंदरातूनही अपघात मोठ्या प्रमाणावर होत असतात. देशाच्या आठ मोठ्या बंदरांतून दरसाल सुमारे ६ हजार लहानमोठे अपघात होतात. कारखान्यांतून होणाऱ्या अपघातांत २० टक्के तरी अपघात कामगारांनी काम करताना अनवधानाने केलेल्या चुकांमुळे घडतात.

---

**तयार कपड्यांची वाढती निर्गत** भारतीय तयार कपड्यांची निर्गत वाढत आहे. १९६७ मध्ये ३·२५ कोटी रु. चे रेडीमेड कपडे निर्गत झाले; १९६८ मध्ये त्यांची निर्गत ५·४२ कोटी रु. ची झाली आणि १९६९ मध्ये त्यांची किंमत ८·२६ कोटी रु. भरली.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २ सप्टेंबर, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## बँकांचे कस्टोडिअन्स

### समाजवादी अर्थपुनर्घटनेचे शिल्पकार कसे बनतील?

राष्ट्रीयीकृत बँकांच्या कस्टोडिअन्सच्या परिषदेत अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या उद्दिष्टास अनुसरून बँकांनी आपला दृष्टिकोन कसा बदलला पाहिजे आणि कार्याची दिशा कशी सुधारली पाहिजे, ह्याचे विवेचन केले. कोणतेही धोरण आखताना आणि अमलात आणताना, बँकांकडील ठेवीत प्रथम फार मोठी वाढ व्हायला हवी, हे त्यांनी स्पष्ट केले. त्याखेरीज काहीच करून दाखविता येणार नाही. एकीकडे ठेवी वाढवीत असताना दुसरीकडे कर्जे देण्याच्या बाबतीत अधिक लवचीकपणा आणण्याचे अवघड कार्य ह्या बँकांचे नेतृत्व आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या कस्टोडिअन्सना करावयाचे आहे आणि ह्या १४ जणांवर भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी येऊन पडली आहे ह्या दृष्टीने श्री. यशवंतराव चव्हाणांनी दिलेले आव्हान येथे उद्धृत केले आहे.

### शाखावाढीमुळे ठेवीत फारशी वाढ झाली नाही

"आपल्या देशाच्या विकासासाठी प्रचंड प्रमाणावर ठेवी जमा केल्या जाणे अत्यावश्यक आहे. दारिद्र्यावरील उपाययोजनेत ठेवीत वाढ ही पहिल्या अनुक्रमाची गरज आहे. ठेवीमुळे गुंतविण्यास पैसा उपलब्ध होतो आणि रोजगारात वाढ होते; जनतेला बचतीची सवय लागते आणि त्यामुळे चलनवाढीच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी होते. गेल्या काही महिन्यांतील ठेवींमधील वाढ उत्साहवर्धक नाही. पब्लिक सेक्टरमधल्या (राष्ट्रीयीकृत) बँकांनी शाखावाढीचा कार्यक्रम यशस्वी केला, ग्रामीण आणि निमशहरी विभागात अनेक शाखा उघडल्या, परंतु त्याचा ठेवींच्या वाढीवर परिणाम झालेला दिसला नाही. उदाहरणार्थ, पंजाबमधील ग्रामीण भागात पूर्वीपेक्षा बरीच आर्थिक भरभराट झाली आहे. देशातील इतर कोणत्याही विभागापेक्षा ती भरभराट मोठी आहे. परंतु, तेथील ठेवीत १९६९ च्या पहिल्या नऊ महिन्यात फक्त ७% च वाढ झाली. अखिल भारतीय वाढीच्या प्रमाणापेक्षाही हे प्रमाण कमी आहे. स्टेट बँकेच्या ठेवींतील वाढीपैकी फक्त ३३% वाढ नव्या शाखांमुळे झाली. जुन्या म्हणजे शहरातील शाखांमुळेच ६७% वाढ झाली. ग्रामीण विभागातील उत्पन्न वाढले तरी ते बँकिंगकडे येत नाही, ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, बँका आणि त्यांचे कस्टोडिअन्स ह्यांच्या कामगिरीचे मापन ठेवींतील वाढीवरूनच केले जाईल, हे मी ठासून सांगू इच्छितो.

### कर्जाच्या उद्दिष्टाची कसून छाननी

"कर्जाचे धोरण ठरविताना बँकरला स्वतःला काही प्रश्न विचारावे लागतात. उदाहरणार्थ, कर्जामुळे उत्पादनवाढीस आणि रोजगारवाढीस चालना मिळते का? प्रादेशिक तफावती दूर होण्यास मदत होते का? विकासात सहभागी होण्याच्या वृत्तीस प्रोत्साहन मिळते का? बँकेचे पारंपारिक हित आणि कर्जदाराची परतफेडीची पात्रता ह्यांचा सुवर्णमध्य गाठला जातो का? कर्जामुळे जिनसा, शेअर्स इत्यादींच्या सोडतीच्या व्यवहारांस चालना मिळत नाही ना? कर्जामुळे काही मूठभर लोकांना आर्थिक साम्राज्ये निर्माण करता येऊन त्यांच्या आर्थिक सत्तेने जनतेला नागविण्यास मदत केली जात नाही ना?

"मध्यमवर्गीयांना रोजच्या उपयोगाच्या जिनसांसाठी कर्जे देण्यात गैर काहीच नाही. परंतु, चैनीच्या जिनसांच्या उपभोगासाठी आणि अनुत्पादक खर्चासाठी मात्र कर्जे उपलब्ध होऊ देता कामा नयेत. श्रीमंतांच्या खर्चिकपणास बँका मदत करीत आहेत आणि सामाजिक व आर्थिक दृष्ट्या उत्पादक अशा उपक्रमांकडे दुर्लक्ष होत आहे, असा ग्रह बँकांनी होऊ देता कामा नये.

### बेकारीच्या निवारणासाठी बँकांचे सहकार्य

"वाढत्या बेकारीकडे मी आपले मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो. सुशिक्षित आणि तांत्रिक शिक्षणाने पात्र अशा तरुणांची बेकारी ही केवळ मानवीच नव्हे तर आर्थिकही समस्या आहे. ह्या तरुणांच्या शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा देशाला फायदा मिळत नाही, असे आज घडून येत आहे. ह्यावर सोपा, तात्काळ करता येण्याजोगा प्रभावी उपाय नाही, ह्याची मला जाणीव आहे. परंतु, बँकिंग व्यवसायाशी संबंध असणाऱ्या सर्वांनी त्याच्या सामाजिक, आर्थिक आणि मानवी महत्त्वाकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे, हे खरे. स्वतःच्या पायावर त्यांना उभे राहण्यास मदत केली पाहिजे. काही बँका त्यांना वाजवी अटींवर कर्जे देत आहेत, तर काहींचा दृष्टिकोन तितकासा सहानुभूतीचा नाही, असे समजते.

### बँकिंग किफायतशीर झालेच पाहिजे...पण...

"बँकिंग हे किफायतशीर असायला पाहिजे, व्यापारी दृष्टी त्यात पाहिजे; त्याने आर्थिक उपक्रमांसाठी स्वतः तोटा सोसावा

अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. तथापि, बँकिंगच्या व्यवहारात थोडा लवचीकपणा आणता येणे शक्य आहे. मोठ्या कर्जदारांच्या बाबतीत बँका असा लवचीकपणा दाखवीत आलेल्याच आहेत; बँकांचे राष्ट्रीकरण झाल्यानंतर त्यांनी आजवर उपेक्षित आणि गरीब लोकांच्या बाबतीत लवचीकपणा दाखविण्याची आता आवश्यकता आहे. उत्पादक कार्यासाठी आर्थिक मदतीची गरज असणाऱ्या परंतु बँकांशी वाटाघाटी करण्याची अद्याप माहिती नसणाऱ्यांना कमी व्याजाने कर्ज देऊन परत फेडीत सवलती देण्यास हरकत नाही. वेगवेगळ्या कर्जदारांसाठी वेगवेगळे व्याजाचे दर ठेवायला काय हरकत आहे? कमी प्राप्तीच्या निवडक कर्जदारांना कमी व्याज आकारून, श्रीमंतांना टप्प्याटप्प्याने जास्त जास्त व्याज आकारण्याची योजना आपण आखू शकणार नाही का?

### व्यापारी आणि सहकारी बँकांचे सहकार्य

"वास्तविक, व्यापारी आणि सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र स्वतंत्र आहे. तथापि, शेती आणि लघुउद्योग ह्यांना अधिकाधिक कर्जे देण्यात येऊ लागली म्हणजे ती कार्यक्षेत्रे इतकी अलग न राहणे संभवनीय आहे. सध्या अशा तऱ्हेचे आक्रमण होत आहे काय, ह्याची माहिती आपण मला सांगावी. व्यापारी आणि सहकारी बँकात ठेवी आणि कर्जे ह्या प्रश्नांबाबत एकसूत्रीपणा कसा राहील, ह्या प्रश्नाचाही विचार आवश्यक आहे. राज्य सहकारी केंद्रीय बँकांच्या चालकांबरोबरही मी ह्याबाबत चर्चा करणार आहेच.

### 'लीड' बँक–यशाचे गमक

"'लीड' बँकेची कल्पना नवीन आहे. परंतु कालांतराने तिला विशेष महत्त्व प्राप्त होईल. केवळ नव्या शाखा उघडणे एवढेच लीड बँकेचे काम नाही. केवळ रिझर्व्ह बँकेच्या सूचना अमलात आणणे, एवढ्या पुरतेच जिल्ह्याच्या पाहणीचे उद्दिष्ट मानले जाऊ नये. ह्या पाहणीच्या पायावर विकासाचे पुढचे कार्यक्रम आधारले जावयाचे आहेत. जेथे तुमच्या शाखा कार्य करतात तेथील लोकांचा आदर, विश्वास आणि प्रेम तुम्ही किती संपादन करता ह्यावरून तुमचे यश मोजले जाईल, आणि ह्या लोकांत फक्त मोजक्या श्रीमंतांचा आणि हक्क सांगणाऱ्यांचाच समावेश होत नाही; सर्वांचा होतो हे विसरता कामा नये.

### कर्मचाऱ्यांची आत्मीयता सत्कारणी लावा

"बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे बँक कर्मचाऱ्यांनी उत्साहाने स्वागत केले. त्यांचे सहकार्य मिळविणे अवघड जाऊ नये. कर्मचाऱ्यांनी सर्वच बाबतीत नव्या ईर्ष्येने आणि तन्मयतेने भाग घ्यायला हवा; त्यासेरीज प्रगती अशक्य आहे. त्यांची आत्मीयता काळजीपूर्वक जतन करून ती सत्कारणी लावली पाहिजे. योग्य प्रकारचे कर्मचारी नेमून त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण देण्याची आवश्यकता निर्विवाद आहे; त्याबाबतीत सर्व बँकांनी एकमेकांशी सहकार्य करायला हवे."

---

### रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचा बँकांना सल्ला

मद्रास येथील बँकर्स क्लबपुढे बोलताना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एस्. जगन्नाथन् ह्यांनी बँकांना व्यवहार करण्याच्या पद्धतीविषयी सल्ला दिला. ते म्हणाले की बँकांना आपले व्यवहार चालविण्याविषयी दिलेल्या सूचनांच्या शब्दार्थावरच केवळ लक्ष देऊन चालणार नाही. मार्गदर्शक सूचनांचा उपयोग फक्त कर्ज नाकारण्यासाठी करण्यात येऊ नये. ज्या हेतूने मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्यात आली आहेत ती लक्षात घेऊन त्यांनी आपला कारभार चालविला पाहिजे. अलीकडे बँकांनी ठेवी गोळा करण्याकडे अधिक लक्ष धावयास प्रारंभ केला आहे. मद्रास भागांतील बँकांनी ह्या बाबतीत बरे काम केले असले तरी लोकांच्या अपेक्षेइतके ते झालेले नाही. बँकांनी ठेवी गोळा करण्यासाठी ग्रामीण भागाकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागांतून गोळा झालेल्या ठेवींचा उपयोग स्थानिक लोकांना तर होईलच. पण त्याशिवाय स्वतःसाठी उद्योग निर्माण करणाऱ्या एंजिनिअर्सना, कुशल कामगारांना, डॉक्टर्सना आणि छोटे उद्योगधंदे काढणाऱ्यांनाही त्यांचा उपयोग होऊ शकेल. सध्या देशातील राजकीय परिस्थिती काहीशी अस्थिर असली तरी एकंदरीने आर्थिक विकासाला अनुकूल अशीच ती आहे. ह्या अनुकूल वातावरणाचा फायदा घेण्यासाठी बँका व इतर वित्तविषयक संस्था ह्यांनी सहकार्य करणे जरूर आहे. योग्य अशा विकास योजनांना आपल्या जवळील पैसा उपलब्ध करून देण्याची कल्पकता त्यांनी दाखविली पाहिजे. बँकांचे कारभार सुधारण्यास अजून बराच वाव आहे. त्यासाठी बँकांत काम करणाऱ्या नोकरवर्गाची कार्यक्षमता सुधारली पाहिजे. हा प्रश्न नाजूक असल्याने बँकांनी तो सोडविण्यात चातुर्य दाखविले पाहिजे.

### मदत करील, तो मित्र

"श्वेतवर्णीयांना आफ्रिकेत राहाण्याचा हक्क नसेल तर प्रेसिडेंट नासर व इतर अरब पुढारी ह्यांना तरी आफ्रिका खंडात राहण्याचा काय अधिकार? नासर काय झुलू जमातीचा आहे? नासर–कैरोमधला तो अरब–त्याचप्रमाणे मोरोक्को, अल्जेरिया, सुदान, इथले अरब वाटेल तो आरडाओरड करोत; मी दक्षिण आफ्रिका, ऱ्होडेशिया आणि पोर्तुगाल ह्यांचा स्नेह सोडणार नाही. मालावीची नवी राजधानी बांधण्यास द. आफ्रिकेने पैसे दिले. ६२ मैल लांबीच्या आगगाडीचा नवा रस्ता करण्यास द. आफ्रिकेनेच मदत केली; द. आफ्रिकेच्या कंत्राटदारांनी मुदतीपूर्वी पाच महिने काम पुरे केले" — मालावीचे प्रेसिडेंट बांडा.

---

**कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी बँकेचा संचालक** — राष्ट्रीयीकृत बँकांच्या संचालक मंडळांत कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधीचा समावेश केला जाईल, असे सरकारतर्फे लोकसभेत आश्वासन देण्यात आले.

## मोटार हाकणाऱ्यांना सावधानतेचा इशारा

शहरांतून आणि हमरस्त्यांवर होणाऱ्या मोटारींच्या अपघातांचे प्रमाण वाढत आहे. ह्या अपघातांची अनेक कारणे असतात. मोटारींच्या अपघाताला वाहनाची अकार्यक्षमता जबाबदार असू शकेल, त्याचप्रमाणे चालविणाऱ्याची अकार्यक्षमता हेही कारण असू शकेल. मोटार चालविणारा नेहमीच योग्य त्या शारीरिक व मानसिक अवस्थेत असेल असे नाही. एखाद्या वेळी त्याचे डोके दुखत असेल, अगर दात दुखत असेल. अशा वेळी चटकन एखादी औषधी गोळी घेऊन मोटार हाकण्यास बसणे साहजिकच असते. पण अशा औषधांचा परिणाम मोटार चालविणाऱ्याच्या कार्यक्षमतेवर होऊन अपघात होण्याचा संभव वाढतो, असा इशारा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रॅन्सपोर्ट ॲण्ड सेफ्टी फर्स्ट असोसिएशनचे सरचिटणीस श्री. एन्. बालकृष्ण ह्यांनी दिला आहे. ह्या बाबतीत झालेल्या संशोधनाचा हवाला देऊन ते म्हणतात की, अशा औषधी गोळ्या घेऊन मोटारी चालविणे प्रसंगी अतिशय धोक्याचे ठरण्याचा संभव असतो. घेतलेल्या गोळ्यांचे प्रमाण जर वाजवीपेक्षा अधिक असेल तर मोटार चालविणाराच्या शारीरिक आणि मानसिक शक्ती बऱ्याच मंदावतात. त्यामुळे कधी कधी ड्रायव्हरच्या डोळ्यांच्या पडद्यावर पडणारे प्रतिबिंब नीट पडत नाही. कधी कधी गाडी चालविताना घ्यावयाच्या अनेक निर्णयांना उशीर होण्याचा संभव वाढतो आणि वेळेवर ब्रेक मारण्याची शारीरिक क्रियाही योग्य वेळी होत नाही. परिणामी अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यातही मद्य आणि औषधी गोळ्या एकदमच घेण्यात आल्या असल्या तर त्याचे परिणाम, आणखीच घातक होऊ शकतात.

---

## पाकिस्तानच्या रुपयाचे लवकरच अवमूल्यन

पाकिस्तानच्या नियोजन समितीचे माजी आर्थिक सल्लागार डॉ. इकबाल कुरेशी ह्यांनी पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीविषयी निराशा व्यक्त करून पाकिस्तानच्या रुपयाचे लवकरच अवमूल्यन करावे लागेल असा अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणतात की, पाकिस्तानची परदेशीय हुंडणावळीची परिस्थिती गोंधळाची झालेली आहे. ढाका येथील 'पाकिस्तान ऑब्झर्व्हर' ह्या वृत्तपत्रात त्यांच्या अभिप्रायाचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. त्यात असे म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांत पाकिस्तानच्या रुपयाचे अवमूल्यन करण्यासाठी परदेशी दडपण वाढत चालले आहे. हे दडपण विशेषतः जागतिक बँकेकडून येत आहे आणि त्यापुढे पाकिस्तानचा टिकाव लागणे कठीण आहे. पाकिस्तानातील अंतर्गत आर्थिक परिस्थिती घसरत चालली आहे. गेली काही वर्षे पाकिस्तानात गरजेच्या वस्तूंच्या किमती एकसारख्या वाढत चालल्या आहेत. गेल्या दहा वर्षांत ह्या वस्तूंच्या किमती १२० टक्क्यांनी वाढल्या आहेत. खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांनी आणि व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर नफेबाजी चालविल्यामुळे किमती वाढल्या. ह्या भाववाढीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सरकारने केले नाहीत. उलट, सरकारने अप्रत्यक्षपणे नफेबाजीला उत्तेजनच दिले. धान्य आणि इतर गरजेच्या वस्तू ह्यांच्या व्यापारावर सरकारचे नियंत्रण असावे अशी सूचना नियोजन समितीकडून करण्यात आली होती. परंतु सरकारने ही सूचना नामंजूर केली आणि नफेबाजीला मुक्तद्वार दिले. पाकिस्तानच्या अंदाजपत्रकानंतरही किमती वाढतच असून त्या अलीकडे आणखी ४० टक्क्यांपर्यंत वाढलेल्या दिसून येतात.

---

## भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी पश्चिम बंगालचे प्रयत्न

पश्चिम बंगालमध्ये नवीन भांडवलाची गुंतवणूक होण्यासाठी काय करावे ह्याचा विचार करण्यासाठी राज्य सरकारने तज्ज्ञांचे एक मंडळ सल्ला व मार्गदर्शन करण्यासाठी स्थापन केले आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस आल्यामुळे राज्य सरकार काही नवे अधिकारही आपल्या हाती घेत आहे. बंगालमधील समाजविरोधी आणि बेकायदा वागणाऱ्या लोकांशी मुकाबला करता यावा म्हणून अधिकाऱ्यांची मर्यादा वाढविण्यात येत आहे. राज्य सरकारचे सल्लागार औद्योगिक विकासाच्या किती संधी उद्योगपतींना आहेत त्याची माहिती जाहीर करीत आहेत. तरीसुद्धा अशांततेच्या व अस्वस्थतेच्या वातावरणामुळे अनेक उद्योगपती राज्यात भांडवल गुंतविण्यास उत्सुक दिसत नाहीत. कामगारवर्गातील असंतुष्टपणा मोठ्या प्रमाणावर आहे.

---

## कापडाच्या निर्यातीचा उच्चांक

भारतात तयार झालेल्या कापडाच्या परदेशांतील विक्रीचा उच्चांक गाठण्यात आला आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत कापडाच्या निर्यातीमुळे ५८·५३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती झाली आहे. १९६६ साली झालेल्या प्राप्तीपेक्षाही हा आकडा अधिक आहे; त्या वेळी तो उच्चांक होता. पश्चिम युरोपमधील बाजारपेठांत हिंदचे कापड आतापर्यंत दिसत नसे. आता प्रथमच ह्या बाजारपेठेत हिंदी कापडाने प्रवेश मिळविला आहे. ह्या वर्षाच्या जानेवारी ते जून ह्या अवधीत झालेली निर्यात मागील वर्षाच्या ह्याच कालातील निर्यातीपेक्षा १६ टक्क्यांनी अधिक आहे. १९६८–६९ सालात सुताच्या निर्यातीच्या बाबतीतही गेल्या १७ वर्षांतील उच्चांक गाठण्यात आला आहे.

---

**बँक ठेवींच्या गुंतवणुकीवर बंधनाची मागणी —** ज्या राज्यातील ठेवी असतील, त्या राज्यातच त्या ठेवींपैकी काही ठराविक रक्कम गुंतविली जावी, ही पंजाब सरकारची मागणी भारत सरकारने फेटाळली आहे.

# विविध माहिती

**बँकांकडील ठेवींत वाढ** — राष्ट्रीयीकृत १४ बँकांकडे त्यांच्या राष्ट्रीयीकरणाचे वेळी २,६२५·८ कोटी रु. च्या ठेवी होत्या. १७ जुलै, १९७० रोजी त्यांच्याकडील ठेवींची रक्कम २,९९८·७ कोटी रु. होती.

**परदेशी प्रवाशांपासून मिळकत**— १९६८ मध्ये भारताला परदेशी प्रवाशांपासून २६·४२ कोटी रु ची परराष्ट्रीय हुंडणावळ मिळाली होती. १९६९ मधील प्राप्तीचा अंदाज २३·११ कोटी रु. आहे.

**नवी फोर्ड कंपनी** — फोर्ड मोटर कंपनीची "फोर्ड एशिया-पॅसिफिक अँड साउथ आफ्रिका इन्कॉर्पोरेटेड" ह्या नावाची नवी कंपनी सुप्रसिद्ध टी सलून मॉडेलच्या सुधारलेल्या मोटारी उत्पादन करील. त्यांची विक्रीची किंमत सुमारे ५,४०० रु. असेल. तिच्या कार्यक्षेत्रात जपान, कोरिया आणि ओकिनावा ही वगळून बाकीचा आशिया आणि पॅसिफिक प्रदेश येईल. भारताचाही तिच्या कार्यक्षेत्रात समावेश असेल.


**डोकेदुखीवर सरकारी गोळी**—सॅरिडॉन, कोडोपायरिन इत्यादी गोळ्या डोकेदुखीवर घेतल्या जातात. त्यांच्या किमती वाढविण्याचा प्रयत्न कारखानदार करीत आहेत, परंतु आता इंडियन ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लि. हा सरकारी कारखाना एपिडिन नावाच्या गोळ्या निर्माण करू लागला आहे. त्याची किंमत प्रत्येकी सात पैसे राहील.

**रेडिओवरील जाहिरातींचे उत्पन्न**—ऑल इंडिया रेडिओवर प्रसृत केल्या जाणाऱ्या जाहिरातींचे १ जानेवारी, १९७० ते ३० जून, १९७० अखेरच्या काळात १,२१,१०,००६ रु. ठोक उत्पन्न झाले. सहा केंद्रांवरून सध्या जाहिराती प्रसृत केल्या जातात. त्यात आणखी ११ केंद्रांची चालू वर्षी भर पडेल. चंदिगड, जालंदर, बंगलोर, धारवाड, कानपूर, अलाहाबाद, राजकोट, हैद्राबाद आणि विजयवाडा ही ती नवी केंद्रे होत.

**इंजिनिअरिंगच्या उत्पादनाची निर्गत** – चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत इंजिनिअरिंगच्या मालाची निर्गत ३०% ने वाढेल अशी अपेक्षा होती; प्रत्यक्ष वाढ फक्त ९% झाली आहे.

**२७ कोटी रु. ची यंत्रसामग्री पडून आहे** — पाणीपुरवठा आणि विद्युतनिर्मिती ह्यांच्या प्रकल्पांतील १०० कोटी रु. च्या यंत्रसामग्रीपैकी २७ कोटी रु. ची यंत्रसामग्री सुट्या भागांच्या अभावी पडून आहे. १८ पैकी फक्त ६ प्रकल्पांतील यंत्रसामग्री ५०% पेक्षा जास्त प्रमाणात वापरात आहे.

**सरदार कारबोनिकचे डिव्हिडंड** — सरदार कारबोनिक गॅस कं. लि. ने ३१ मार्च, १९७० अखेर संपलेल्या वर्षासाठी ५% इंटरिम + ९% फायनल असे एकूण १४% डिव्हिडंड (गेल्या वर्षीप्रमाणेच) जाहीर केले आहे.


**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
**MADHAVNAGAR [S. Rly.]**
Phone : 318 Sangli — Gram : 'SEWA Madhavnagar

**THE BELGAUM BANK LIMITED**

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

Share Capital : Rs. Over 8 Lakhs
Reserves : Rs. Over 8½ Lakhs
Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT — *General Manager.*
K. B. KIRTIKAR — *Chairman.*

## बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे ग्रामीण जनतेचा लाभ

दिल्लीच्या आसपासच्या ग्रामीण भागात सावकाराकडील कर्जाचे व्याजाचे दर एकदम उतरले आहेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी सावकार लोक ६० टक्क्यांपर्यंत व्याज घेत असत. आता ते कर्जावर २० टक्क्यांइतकेच व्याज घेतात. बँकांकडून ग्रामीण भागातील लोकांना अल्प व्याजाच्या दराने कर्जे मिळू लागल्यापासून सावकाराच्या उत्पन्नात चांगलीच घट झाली आहे. आतापर्यंत सावकार लोक नडीचा फायदा घेऊन आपणाकडून भरमसाट दराने व्याज घेऊन आपली पिळणूक करीत होते असे शेतकऱ्यांना वाटू लागले. शेतकऱ्याच्या पतीबद्दलच्या कल्पनाच बँकांनी आता बदलल्या आहेत. पूर्वी ज्या शेतकऱ्यांना योग्य तारणाअभावी कर्जे मिळणे दुरापास्त होते त्यांना आता ती सहज मिळू लागली आहेत. ज्या शेतकऱ्याजवळ थोडीशी जमीन आहे, अगर एखादी बैलजोडी आहे त्यालाही आता कर्ज मिळू शकते. इतकेच काय पण प्रामाणिकपणे श्रम करण्याची तयारीही बँकेला पुरते. दिल्ली राज्यातील मेहरोली भागात सिंडिकेट बँकेच्या दोन शाखा आहेत. ह्या शाखांच्या ऋणकोत सुमारे ६०० सामान्य नागरिक आहेत, त्यात काही शेतकरी आहेत, काही छोटे दुकानदार आहेत, काही गवळी आहेत आणि काही नोकरीवालेही आहेत. ह्या गिऱ्हाइकांकडून बँकेकडे बऱ्याच ठेवीही येत आहेत. ह्या छोट्या गिऱ्हाइकांच्या कर्जविषयक गरजा बँक भागवू लागली आहे. ग्रामीण भागात बँकेचा व्याप वाढविण्यास प्रारंभ करून सुमारे वर्षाचा काळ लोटला आहे. ह्या अवधीत बँक चालकांची अशी खात्री झाली आहे की बँकिंगच्या धंद्याला अनेक नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

शेतकरी घेतलेल्या कर्जाचे परतफेडीचे हप्ते वेळेवर देऊ शकत नाहीत ही समजूत चुकीची ठरली आहे. बँकेच्या खातेबुकावरून असे दिसून आले की १० ते १२ ऋणकोंपेक्षा अधिकांनी आपले हप्ते चुकविलेले नाहीत. काही लोकांना घरच्या अडचणी होत्या. त्या निवारल्यावर हप्ते देण्याची तयारी त्यांनी दाखविली आहे. शेतकऱ्यांना नाममात्र व्याजाच्या दराने कर्जे मिळू लागली आहेत. पूर्वी नलिकाकूप खोदण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जे देण्याचे अधिकार बँकेला होते. दिल्लीच्या आसपासची जमीन अशा विहिरी खोदण्यास अनुकूल नाही. कारण, थोड्या खोलीवरच खडक लागतो. त्यामुळे विहिरी खोदण्याचा खर्च इतर ठिकाणच्या तुलनेने जास्त येतो. इतर ठिकाणांपेक्षा तिप्पट ते चौपट खर्च ह्या भागात अधिक येतो. पण ह्या जमिनी गुरांसाठी गवताचे कुरण करण्यास मात्र चांगल्या आहेत. शेतीपेक्षा गुरांच्या पैदाशीसाठी त्या अधिक योग्य आहेत. ह्या परिस्थितीचा विचार करून बँकेला आपल्या कर्जविषयक धोरणात बदल करणे आवश्यक वाटू लागले. मुख्य कचेरीच्या परवानगीने नलिकाविहिरीसाठी कर्जे देण्याऐवजी दुग्धदुभत्याच्या व गुरांच्या पैदाशीच्या धंद्याला बँकेने कर्जे देण्यास प्रारंभ केला. शेतकऱ्यांच्या स्त्रियांना म्हशी घेण्यासाठी बँक आता कर्ज देते. दोन २,५०० रुपये किमतीच्या म्हशी घेण्यासाठी २ हजार रुपये कर्ज मिळू शकते. त्यामुळे त्यांना उद्योग मिळतो आणि दुधाचे उत्पादनही वाढते. दुधासाठी, शेळ्या पाळण्यासाठी आणि डोंगराळ भागात वाहतूक करण्यासाठी व खेचरे घेण्यासाठी बँक कर्ज देते. विटांच्या भट्ट्यांच्या धंद्यालाही बँक कर्ज देते. ह्याचा परिणाम म्हणून ह्या भागातील विटांच्या भट्ट्यांचा धंदा अलीकडे खूपच फोफावला आहे.

---

## युगोस्लाव्हिआला मालवाहू डबे पुरविणार

भारत युगोस्लाव्हिआला ४ हजार रेल्वे वाहतुकीचे डबे पुरविणार आहे. ह्या मालाची किंमत ५० कोटी रुपये होईल. युगोस्लाव्हिआला मालवाहू डब्यांची मोठ्या प्रमाणावर गरज असल्याने येत्या चार-पाच वर्षांत भारताकडून १५ ते २० हजार मालवाहू डबे घेण्याची योजना त्याने आखली आहे. तितकेच डबे तो देश स्वतःच्या रेल्वेकारखान्यांतून तयार करणार आहे. भारताकडून पुरविण्यात यावयाच्या डब्याचा नमुना युगोस्लाव्हिआ देणार आहे. त्या नमुन्याप्रमाणे भारतात खास डबे बनविण्यात यावयाचे आहेत. ह्याविषयीचा करार करण्यासाठी युगोस्लाव्हिआच्या प्रतिनिधी मंडळाला पुढील महिन्यात भारतात बोलावण्यात आले आहे. रशिआला पुरविण्याच्या डब्यांच्या किमतीबद्दल अद्याप एकमत झालेले नाही.

---

## मालमत्तेवरील बंधने मध्यम वर्गाला घातक

अहमदाबाद येथे बोलताना प्रख्यात वकील श्री. एन्. ए. पालखीवाला ह्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की मालमत्ता धारण करण्याच्या मूलभूत हक्कावर निर्बंध घालण्यात आले तर समाजातील मध्यम वर्ग आणि अल्पसंख्याक ह्यांना ते अतिशय घातक ठरेल. नागरिकांचे मूलभूत हक्क राखण्याची खरी हमी म्हणजे न्यायालये आहेत. देशातील न्यायालये त्यांचे रक्षण करतील अशी खात्री बाळगण्यास हरकत नाही. आज 'मालमत्ता' हा शब्द कलंकित झाला आहे. पण उद्या 'स्वातंत्र्य' हा शब्दही उपहासाचा होऊ शकेल. एकदा एक प्रकारचा हक्क हिरावून घेण्यात आला म्हणजे त्याच्या पाठोपाठ इतर हक्कांचीही तशीच वासलात लागण्याची शक्यता असते. मालमत्तेचा हक्क एकदा नाहीसा झाला की इतर हक्कांचीही तशीच गत होण्याचा संभव आहे.

---

## परदेशी प्रवाशांच्या संख्येत १८ % वाढ

### अमेरिकन-इंग्रजांचा मोठा भरणा

१९७० च्या पहिल्या सहामाहीत भारतात एकूण १,२९,०१७ परदेशी प्रवासी आले. गेल्या वर्षी ह्याच सहामाहीत १,०९,२०९ आले होते. म्हणजे, त्यात १८·१% वाढ झाली. ह्या परदेशी प्रवाशांचे प्रमाण असे होते :— अमेरिका २०·%, ग्रेटब्रिटन १५·३%, सिलोन ७·८%, जर्मनी ५·६%, फ्रान्स४·८%, ऑस्ट्रेलिया ४·३%, मलेशिया ३·९%, जपान ३·६%, कॅनडा २·५%. आलेल्या प्रवाशांपैकी८३·९% विमानाने, १०·५% आगबोटीने आणि ५·६% मोटारीने आले.

---

## शिक्षणापेक्षा शस्त्रसंभारावर अधिक खर्च

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शैक्षणिक, शास्त्रीय आणि सांस्कृतिक संघटनेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'कुरियर' ह्या नियतकालिकात पुढील उद्बोधक माहिती देण्यात आली आहे. जगातील प्रत्येक देश प्रत्येक मुलाला लिहिणे, वाचणे शिकविण्यासाठी दरसाल सरासरी ७५० रुपये खर्च करतो. आणि मग काही काळाने बंदुकीसारखी हत्यारे कशी उडवावी हे शिकविण्यासाठी ५८,५०० रुपये सरासरी खर्च करतो जगातील अनेक देशांच्या शैक्षणिक व लष्करी अंदाजपत्रकावरून असे आढळते की शिक्षणासाठी जगातील देश दरसाल ८२,५०० कोटी रुपये खर्च करतात आणि शस्त्रास्त्रे तयार करण्यासाठी दरसाल १,१९,२५० कोटी रुपये खर्च करतात. विकसित देश शस्त्रास्त्रावर अधिक खर्च करतात. तरीसुद्धा त्यांच्या शिक्षणावर लष्करी खर्चाचा वाईट परिणाम होत नाही.

---

## योजनेप्रमाणे फक्त कर्जाचा बोजा वाढला आहे

"मी गोंधळून गेलो आहे. स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळी आम्हांस वाटत होते की स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण चमत्कार घडवून आणू शकू. आपल्या देशाची परदेशातील १,८०० कोटी रु. ची शिल्लक आपण खलास करून टाकली आहे. आपण परदेशातून जी कर्जे घेतली आहेत, त्याचा दरमाणशी बोजा ६०० रु. चा बसला आहे. बचतीचे प्रमाण उतरत आहे, गुंतवणूक कमी होत आहे आणि भांडवल-निर्मिती घटत आहे, त्यामुळे सामाजिक असंतोष वाढत आहे, महागाईला ऊत आला आहे. श्री. चिंतामणराव देशमुखांनी पहिली पंचवार्षिक योजना व्यावहारिक दृष्टीने केली होती. पण आता चलनवाढीने आर्थिक क्षेत्र ग्रासून टाकले आहे. योजना एका बाबतीत मात्र यशस्वी झाल्या आहेत; योजनेप्रमाणे कर्जाचा बोजा वाढला आहे! सर्व क्षेत्रातील तंत्र्यांचे दुष्परिणाम आपण आता भोगीत आहो" :—श्री. एन्. दांडेकर, एम्. पी., भूतपूर्व इनकमटॅक्स कमिशनरच्या हुद्यावरील आय. सी. एस. अधिकारी.

---




## जमशेटपूरच्या भवितव्यावर पडलेले सावट

बिहारच्या विधानसभेने गेल्या अंदाजपत्रकी अधिवेशनात बिहार जमीन सुधारणा (दुरुस्ती) बिल, १९७० मंजूर केले आहे. ह्या बिलाला अजून राष्ट्रपतींची संमती मिळावयाची आहे. बिलातील तरतुदीत टाटा कंपनीचे जमशेटपूरमधील जमीनदारीचे हक्क रद्द करण्याची व्यवस्था आहे. बिलाचे कायद्यात रूपांतर झाल्यावर जमशेटपूर ह्या शहराचा कारभार राज्य सरकार आपल्याकडे घेईल आणि टाटा कंपनीकडे कारखाने उभ्या असणाऱ्या जागाच तेवढ्या राहतील. बाकीची जमीन योग्य ती नुकसानभरपाई देऊन सरकार आपल्या ताब्यात घेईल. टाटा कंपनीने सर्व कारखान्यांची व वसाहतींची जोपासना अपत्यतुल्य प्रेमाने केलेली आहे. त्यामुळे अर्थातच ह्या सर्व इस्टेटी बद्दल टाटांना फार जिव्हाळा आहे. खुद्द जमशेटपूर शहराच्या उभारणीसाठी त्यांनी २० कोटी रुपये खर्च केलेले आहेत. त्या शहरातील सर्व आधुनिक व्यवस्थेसाठी ते दरसाल १ कोटी रुपये खर्च करीत आहेत. तेथील शाळा, इस्पितळे, सामाजिक सुखसोयी, इत्यादी संघटना आदर्श अशा आहेत. जमशेटपूरचा स्थानिक कारभार चालविणाऱ्या कचेरीत ५,०००. नोकर आहेत. ह्या प्रकरणात टाटांची बाजू अशी की त्यांच्या ताब्यात असलेली जमीन जमीनदारीतील नाहीच. टाटा कंपनीला खंड देणारी कुळे ह्या जमिनीवर नाहीत. ही जमीन म्हणजे टाटा कारखान्यांची व त्यांच्याशी संबंधित असलेली इतर जमीन बिहार सरकारने १९०९ आणि १९२९ च्या दरम्यान कायद्याने ताब्यात घेऊन कंपनीला दिलेली आहे. म्हणून १९७० मध्ये मंजूर झालेले बिहार विधान सभेचे बिल त्या जमिनीला मुळातच लागू नाही. ह्या बिलातील तरतुदीप्रमाणे १९५० मध्ये मंजूर झालेल्या मूळ कायद्यांतील एक महत्त्वाचे कलम गाळण्यात येणार आहे. मूळचा कायदा शेती सुधारणेसंबंधी असल्याने त्याचा खरा उद्देश सरकार आणि कुळे ह्यांमधील मध्यस्थ नाहीसा करण्याचा होता. उद्योगधंद्यासाठी वापरण्यात येत असलेल्या जमिनीला तो लागू नव्हता व नाही.

ह्या उलट बिहार सरकारचे म्हणणे असे आहे की टाटा कंपनी अनेक वेळा जमीनदाराप्रमाणे व्यवहार करीत आली आहे. १९३५ च्या सर्व्हे सेटलमेंटमध्ये टाटांचे जमीनदार असे वर्णन करण्यात आलेले आहे. कंपनीने कुळांना दिलेल्या जमिनीचा खंड वसूल करण्यासाठी अगर जमिनीचा कबजा मिळविण्यासाठी अनेकदा फिर्यादी दाखल केलेल्या आहेत. १९५१ मध्ये जमीनदारी नाहीशी करण्यात आली. त्यावेळी सरकारला माहिती पुरविताना टाटा कंपनीने प्रथमच आपण जमीनदार नसल्याचा मुद्दा पुढे मांडला आहे. टाटा कंपनीकडे सध्या असलेली जमीन १९०८ मध्ये तिने दुसऱ्या एका कंपनीकडून मिळविली. ही जमीन १८ खेड्यांतील होती व त्यासाठी टाटा कंपनीने ३६ हजार रुपये दिलेले आहेत. परंतु त्या कंपनीकडून टाटांनी जमीन घेतली तिलाच मुळात ह्या जमिनीवर संपूर्ण स्वामित्वाचे हक्क कायद्याने प्राप्त होत नव्हते. अर्थातच टाटांनाही तसे स्वामित्वाचे अधिकार प्राप्त झालेले नाहीत. म्हणूनच त्यांच्याकडे असलेल्या जमिनी बिहार सरकारला कायद्याने ताब्यात घ्याव्या लागल्या व मग कंपनीला द्याव्या लागल्या.

बिहार सरकारच्या नव्या कायद्याविरुद्ध टाटा कंपनी कायदेशीर दाद मागण्याचा विचार करीत आहे. दरम्यान जमशेटपूर आणि तेथील औद्योगिक वसाहत ह्यांचे काय होणार अशी चिंता उत्पन्न झाली आहे. कारण, वसाहती शेजारील साक्चीनगरसारख्या शहरातील बिहार सरकारचा कारभार फारसा कुशलतेने चाललेला दिसत नाही.

---

## पशुपूजेची प्रथा इजिप्तमध्येही आढळते

पशुपूजेची प्रथा केवळ भारतातच आहे असे मानण्याचे कारण नाही. शंकराच्या देवळातील नंदीचा मान राखण्यात येतो. नागपूजाही करण्यात येते. इजिप्तमध्ये मांजरांची देव म्हणून पूजा करण्यात येत असे. त्यांच्यासाठी देवळेही बांधण्यात येत. गेल्या शतकात मांजरासाठी बांधलेले एक मोठे मंदिर पुराणवस्तुशास्त्रज्ञांना आढळून आले. प्राचीन इजिप्तमध्ये मांजरांना फार मोठा मान दिला जात असे. त्यांच्यासाठी बांधण्यात आलेले एक दफनस्थानही अलीकडे सापडले आहे. तथापि मांजरांचा व्यावहारिक उपयोगही करून घेण्यात येत असे. इजिप्त हा देश मांजरांचे मूळ स्थान म्हणून समजले जाते. काही तज्ज्ञांच्या मताने इजिप्तच्या लोकांनी मांजरांना माणसाळवले आणि गुरांचे व अन्नधान्याच्या कोठाराचे रक्षण करण्याचे काम त्यांना शिकविले. युद्धात किल्ल्याच्याभोवती लक्ष ठेवण्याचे कामही ती करीत.

---

## स्त्रीचा स्त्रीशी विवाह

स्त्रीचा पोषाख केलेल्या कॅरोल मेरी लॉर्ड ह्या 'वधू'ने सूट घातलेल्या टेरी फ्लाइड ह्या 'वरा'शी २० ऑगस्ट रोजी इंग्लंडमध्ये नोंदणी पद्धतीने विवाह केला. वधू-वर दोघेही स्त्री होते. दोन स्त्रियांचा एकमेकींशी कायदेशीर विवाह होऊ शकतो का, हे त्यांना तपासून घ्यावयाचे आहे. पोलिसांनी त्यांच्या विवाहाचे सर्टिफिकिट जप्त केले आहे, पण त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविलेला नाही. "कोर्टात त्याविरुद्ध निवाडा होईपर्यंत हा विवाह गैरवाजवी नाही" असे नोंदणी करणाऱ्या रजिस्ट्रारचे मत आहे. "मी तांत्रिक दृष्ट्या स्त्री आहे परंतु मला पुरुषासारख्या भावना आहेत" असे टेरी फ्लाइडचे म्हणणे आहे.

---

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता : "मॉर्गेज"
दूरध्वनी : मुख्य कार्यालय २६७८०१/२/३
कार्यकारी संचालक २६१४९७

# दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.


जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने लगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६९ अखेर बँकेचे भागभांडवल ६ कोटी ६६ लाख, गंगाजळी ४५ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २८ कोटी व येणे कर्ज ८५ कोटी आहे.


नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

शा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक



इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.



कारखानदार—

# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२

तार : Vijayplow


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )